राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीतील इलेक्ट्रॉनिक वजन काटयावर वजन करण्यात येणाऱ्या पॅकबंद शेतमालावर तोलाई आकारणी संदर्भात शिफारस करण्याकरिता समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: कृबास ०८१६/प्र.क्र.५०७/११-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दि. ०८ ऑगस्ट, २०१९

संदर्भ: १) पणन संचालक, पुणे यांचे जा.क्र. पणन-५/कृउबास/इले.काटा/ तोलाई/ २०१४, दि. १६ डिसेंबर, २०१४.

२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, आदेश क्र. शिकाना- १२१४/ प्र.क्र.३४/ ११-स, दि. २२.१२.२०१४.

३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, आदेश क्र. कृबास ०८१६/ प्र.क्र.५०७/ ११-स, दि. १.१२.२०१८.

४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय शासन निर्णय समक्रमांक दि.०८.०१.२०१९

५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय शासन निर्णय समक्रमांक दि.२४.०१.२०१९

प्रस्तावना:-

इलेक्ट्रॉनिक वजन काटयांवर शेतमालाचे वजन करण्यात येत असेल तसेच पॅकबंद शेतमालावर तोलाई आकारण्यात यावी किंवा कसे? याबाबत सर्वकष विचार करून निर्णय घेणे आवश्यक असल्यामुळे, यासंदर्भात शिफारस करण्याकरीता पणन विभागाच्या नियत्रंणाखालील क्षेत्रीय कार्यालयातील अपर निबंधक दर्जाच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन क्र. ४ नुसार समिती गठित करण्यात आली होती. तथापि सदर शासन निर्णयात गठित करण्यात आलेल्या समितीत "पणन संचालक" ऐवजी सहकार विभागातील अन्य अधिकाऱ्याची समितीचे "अध्यक्ष" म्हणून तसेच फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्स यांच्या एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

वर नमुद केलेल्या समितीच्या अध्यक्षपदी श्री.सुनिल पवार, अपर निबंधक तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच श्री.वालचंद संचेती, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्स यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. सदर समितीने **दिनांक २२.०८.२०१९ पुर्वी आपला अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्राच्या शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८०८१५२७३७८१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KALU GONYA
VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, postalCode=400032, street=MANTRALAYA , MUMBAI ,
serialNumber=8c5d0f275c3d9a21db07fecf7919c2d83796e88930d62d44e7a4a6d4cbee7e0e, ou=CO OPERATION MARKETING AND TEXTILE DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KALU GONYA VALVI
Date: 2019.08.08 15:33:57 +05'30'

(का. गो. वळवी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा. मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव
३. संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य, कृषी पणन मंडळ, पुणे
५. मा. श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
६. श्री. सुनिल पवार, अपर निबंधक तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे
७. श्री. विकास मगदूम, बाबा आढाव हमाल पंचायत प्रतिनिधी
८. श्री. नारायण पोटे, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन
९. श्री. वालचंद संचेती, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्स, १३४, माकेट मार्ड, पुणे
१०.श्री. दिपक शिंदे, सरव्यवस्थापक, म.रा. कृ. प.मंडळ, पुणे
११.निवड नस्ती, कार्यासन-११-स.